वानवडी पो.स्टे.पुणे शहर
दि.०५/०४/२०१९

# प्रेसनोट

## वानवडी पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई – गुंड टोळीस दणका

वानवडी पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार नामे रिजवान ऊर्फ टिपू सत्तार पठाण रा. गल्ली नं.१७ समोर, खॉजा मंजिल बिल्डींग, दुसरी मजला, सय्यदनगर, हडपसर, पुणे. याने त्याचे साथीदारांसह सय्यदनगर परिसरात दहशत माजवून झालेल्या भांडणावरून दि.०५/०१/२०१९ रोजी इसम नामे निलेश शेखर बिनावत रा. सातवनगर, हांडेवाडी, रोड, पुणे. यांचे राहते घरावर शस्त्रांसह हल्ला केला असता सदर इसम त्याचे मोटारीतून स्वतचा बचाव करण्यासाठी जात असताना सदर आरोपीताने त्याचे साथीदारांसह पाठलाग करून त्यांचेवर पिस्तूलातून गोळ्या झाडल्या होत्या.

सदर झाले प्रकाराबाबत नमुद आरोपी व त्याचे सांथीदारांविरूध्द वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. १९/२०१९ भादवी कलम ३०७, १२० बी, २०१, १४३,१४४,१४७,१४८,१४९,५०६ (२) सह भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), ४ (२५) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह क्रिमिनल अमेन्मेंन्ट अ‍ॅक्ट कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद असून सदर गुन्ह्याचा तपास हा सहा.पोलीस निरीक्षक शेखर शिंदे यांनी केला आहे. दाखल गुन्ह्यामधील आरोपीतांची नावे खालीलप्रमाणे

१) रिझवान ऊर्फ टिपू सत्तार पठाण (मुख्य आरोपी)
२) अजिम ऊर्फ आंट्या महंमद शेख
३) एजाज सत्तार पठाण
४) तनविर शकील शेख
५) राजेश दिलीप पवार
६) सोहेल अनिस पठाण
७) सद्दाम सलीम पठाण
८) नदिम बाबर खान
९) मतिन हकीम सय्यद
१०) इम्तीयाज खाजा पठाण
११) एजाज युसूफ इनामदार पटेल
१२) अजिंक्य ऊर्फ चिम्या बाळासाहेब उंद्रे
१३) ऋषीकेश ऊर्फ ऋष्या अनिल सोनवणे
१४) जैद कलीम बागवान
१५) शाहरूक ऊर्फ अट्टी रहीम शेख
१६) उबेद अन्सार खान

वरिल सर्व राहाणार सय्यदनगर, हडपसर पुणे. यांना अटक करण्यात आले आहे. यातील मुख्य आरोपी रिजवान ऊर्फ टिपू सत्तार पठाण याची गुन्हेगारी टोळी असल्याचे गुन्ह्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले. सदर टोळीविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) , ३(२) कलमांचा अंतर्भाव करणेसाठी पोलीस उप आयुक्त परिमंडळ -५ चे श्री. गायकवाड यांचे मार्फतीने श्री. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर यांना सदर

कायाद्याचे कलम २३(१)(अ) प्रमाणे प्रस्ताव सादर केला असता श्री. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी वरिल आरोपीतांवरूध्द दाखल प्रस्तावास मंजूरी देऊन महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) , ३(२) अंतर्भुत करण्याची परवानगी देण्यात आली.

अशाप्रकारे सदर आरोपीतांविरूध्द मोक्का अंतर्गत कारवाई केल्याने सदर गुन्हेगारांविरूध्द तसेच परिसरातील इतर गुन्हेगारांवर नियंत्रण राहुन लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने सदर भागामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत होण्यास मदत होणार आहे. सदरची कारवाई श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त परिमडळ-५, पुणे शहर, श्री. मिलींद पाटील सहा. पोलीस आयुक्त वानवडी विभाग, पुणे शहर, श्री. सुनिल भोसले, वरिष्ठ पोलीस निरिक्षक वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर , श्री. रावसाहेब भापकर, पोलिस निरिक्षक (गुन्हे), वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आलेली आहे. यापुढे अशा प्रकारच्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांचे विरूध्द कार्यवाही करण्यात येणार आहे.

(सुनिल वि. भोसले)
वरिष्ठ पोलीस निरिक्षक
वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर